| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) द्वितीय श्रेणी | उपलेखापाल [1][कनिष्ठ लेखा अधिकारी] | १. नेमणूक एक तर—<br>(अ) उपलेखापालाची परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले [2][आणि वरिष्ठ सहाय्यक लेखा)] या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केलेल्या वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यास पदोन्नती देऊन केली जाईल.<br>परंतु, उक्त परीक्षा उत्तीर्ण झालेली एकही व्यक्ती नसेल, तर वरिष्ठ सहायक (लेखा) या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तीमधून तिच्या पदोन्नतीची तारीख अथवा हे नियम प्रसिद्ध झाल्याची तारीख यांपैकी जी तारीख नंतरची असेल, त्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत ती उक्त परीक्षा उत्तीर्ण होईल आणि ती परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास ती कनिष्ठ पदावर प्रत्यावर्तीत केली जाण्यास पात्र होईल. या अटीवर पदोन्नती देण्यात येईल :<br>आणखी असे की, उपलेखापाल म्हणून ज्यांस १ मे १९६२ नंतर यापूर्वीच पदोन्नती देण्यात आलेली असून जे उक्त परीक्षा उत्तीर्ण झाले नसतील त्यांना हे नियम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत ही परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल. जे ही परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांस कनिष्ठ पदावर प्रत्यावर्तित केले जाण्यास ते पात्र ठरतील.<br>तसेच संबंधित विभागाचे आयुक्त, अपवादात्मक बाबतीत कारणे लेखी नमूद करून पहिल्या व दुसऱ्या परंतुकात विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी एक वर्षाने वाढवू शकतील. |



[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ एप्रिल १९९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला,
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १ सप्टेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांहून अधिक नसेल आणि<br>(दोन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली असेल व कोणतेही सरकारी कार्यालय, व्यापारी भागीदारी संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यांतील किमान ५ वर्षांचा अखंड सेवेचा ज्यांना अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. याबाबतीत लेखाशास्त्र आणि लेखापरीक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्यांना अथवा प्रथम वा द्वितीय वर्गातील पदवी धारण करणाऱ्यांना अधिक पसंती दिली जाईल.<br>किंवा<br>गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखा शास्त्र व लेखा परीक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. याबाबतीत कोणत्याही सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थेतील अथवा स्थानिक प्राधिकरणातील लेखाकार्याचा अनुभव असणाऱ्यास अधिक पसंती दिली जाईल.<br>(२) नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेल्या व्यक्तींना उपलेखापालाची परीक्षा त्या पदावरील त्यांच्या नेमणुकीपासून दोन वर्षांच्या आत उत्तीर्ण व्हावे लागेल. ती उत्तीर्ण न झाल्यास तो सेवामुक्त केला जाण्यास पात्र होईल :<br>परंतु अपवादात्मक बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकारी, कारणे लेखी नमूद करून परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या कालावधीत एक वर्षाने वाढ करू शकेल. "<br>(३) २५ टक्क्यांहून अधिक नसतील एवढी पदे नामनिर्देशनाद्वारे भरली जातील. |



Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner